NAVJYOT /Vol. X / Issue – I ISSN 2277-8063

# ' नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आणि ७४ वी घटनादुरूस्ती'

**डॉ. शहाजीराव धोंडीराम वारके,** कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी
मो.नं. ९८८१४७७२७२ ई-मेल - drsdwarke@gmail.com

---

**प्रस्तावना**

भारतात ब्रिटिशपूर्व कालखंडात नागरिकरणाचे प्रमाण अगदी अल्प होते. त्याकाळी राजधान्या, व्यापारी केंद्रे आणि धार्मिकस्थळांपुरते मर्यादित नागरीकरण होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात औद्योगिकरणाची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे खेडयांकडून शहरांमध्ये स्थलांतराचे प्रमाण वाढत गेले. या प्रक्रियेमुळे शहरांचा विस्तार व नव्या शहरांच्या निर्मितीलाही चालना मिळाली. वाढत्या नागरी वस्त्यांमध्ये रस्ते, वीज, दळणवळण सुविधा निर्माण करण्याबरोबरच वाढत्या गर्दीमुळे घरांची समस्या, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन यासारख्या समस्या हि उद्भवू लागल्या. नागरीकरण विस्तार व नागरी समस्या विचारात घेऊन ब्रिटिशांनी भारतात नागरी व्यवस्थापन स्वराज्य संस्था स्थापन केल्या. त्यांचा कारभार स्थानिक लोकांकडे सोपविण्यात आला. या प्रयोगाने भारतीयांना या संस्थांमध्ये काम करण्याची संधी तर मिळालीच शिवाय स्थानिक प्रशासन लोकाभिमुख होण्यासाठी मदत झाली. महानगरपालिका आणि नगरपालिका लोकशाही कामकाजाच्या प्रशिक्षण संस्था ठरल्या व त्यातून स्थानिक जनतेतून भावी नेतृत्वाचा उदय झाला, हे शहरी नेतृत्व ब्रिटिश सत्तेविरुद्ध चळवळीत अग्रभागी राहिले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारतात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा खऱ्या अर्थाने विकास झाला. १९९३ सालच्या ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे त्यांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे या संस्था सक्षम व अधिकार संपन्न बनल्या आहेत.

साधारणतः शहरी भूप्रदेशाच्या मर्यादित क्षेत्रातील शासनाला नागरी स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणता येईल. राज्य शासनाने दिलेल्या अधिकाराच्या मर्यादेत नागरी स्थानिक शासनाचे कार्य चालते. या क्षेत्राशी निगडित केंद्र आणि राज्य शासनाने केलेले कायदे आणि आखलेली धोरणे राबविण्याची जबाबदारी स्थानिक शासनावर असते. या संदर्भात जे.जे. क्लार्क यांनी "आउट लाईन ऑफ लोकल गव्हर्मेंट " या पुस्तकात केलेली व्याख्या महत्वाची आहे. " स्थानिक शासन हा राष्ट्रीय अथवा प्रांतिक शासनाचा असा भाग आहे की, जो मुख्यतः विशिष्ट प्रदेश किंवा तेथील रहिवाशांशी संबंधित प्रशासकीय विषय हाताळत असतात. त्याचबरोबर तो प्रांतिक शासनाचा दुयम विभाग म्हणून संसदेने सोपविलेल्या प्रशासकीय विषयांचीही अंमलबजावणी करत असतो".

**भारतातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास -**

लोकनियुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांचा उदय सर्वप्रथम युरोपमध्ये घडून आला, परिणामी ब्रिटिश राजवटीच्या काळात लोकप्रतिनिधीमार्फत चालविल्या जाणाऱ्या ग्रामीण व शहरी स्थानिक शासनाच्या उदय व विकासाला चालना मिळाली. या विकासाच्या पहिल्या टप्प्यात ब्रिटिशांनी १६८७ मध्ये मद्रास महानगरपालिकेची स्थापना केली. त्यानंतर १७२८ मध्ये मुंबई (बॉम्बे) आणि कलकत्ता महानगरपालिका स्थापना झाल्या. १७९३ मध्ये भारतातील नगरप्रशासनासंबंधी लिखित कायदा अस्तित्वात आला. त्यानुसार मद्रास, बॉम्बे व कलकत्ता या तीन शहरांसाठी पालिका प्रशासनाची निर्मिती करण्यात आली. पुढे १८४२ मध्ये बेंगॉल ॲक्ट तयार करण्यात आला. हा कायदा जिल्ह्याचे मुख्यालय असणाऱ्या शहरांनाही लागू करण्यात आला. ब्रिटिशांनी आपली व्यापारी केंद्रे विकसित करण्याच्या दृष्टीने शहरी विकासाकडे विशेष लक्ष दिलेले होते. परिणामी त्यांना पालिका प्रशासनावर आपली मजबूत पकड निर्माण केली. व्हाईसरॉय लॉर्ड मयो यांनी नागरी आणि लॉर्ड रिपन यांचे ग्रामीण प्रशासनाबाबत विशेष योगदान दिलेले आहे. लॉर्ड रिपन

यांनी १८८२ मध्ये मांडलेल्या ठरावामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासाला चालना मिळाली. या ठरावाच्या मसुदयात स्थानिक संस्थांमध्ये निर्वाचित सदस्यांची संख्या जास्त असावी, त्यांचा अध्यक्ष लोकनिर्वाचित असावा आणि संस्थांना उत्पन्नाची पुरेशी संसाधने उपलब्ध करून द्यावीत हे ठळक मुददे अंतर्भूत होते. १८९० मध्ये रॉयल कमिशनच्या अहवालात लोकनिर्वाचित सदस्यांमार्फत नगरपालिकेच्या अध्यक्षाची निवड करण्यात यावी आणि प्राथमिक शिक्षणाचे काम नगरपालिकांकडे देण्यात यावे अशा प्रमुख शिफारशी करण्यात आल्या होत्या. या शिफारशी १९१५ मध्ये ब्रिटिश शासनाने स्वीकारल्या. तथापि त्यांची अंमलबजावणी झाली नाही. १९३० मध्ये ' इंडियन स्टॅट्युटरी कमिशन ' नेमण्यात आले होते. त्याद्वारे लोकशाही विकेंद्रीकरणाला पोषक पाऊल ब्रिटिश शासनाकडून उचलण्यात आले. १९३५ च्या कायद्यानंतर काही प्रमाणात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नियुक्त सदस्यांची संख्या कमी करण्यात येऊन या संस्थांच्या अधिकारात अंशतः वाढ करण्यात आली.

**घटनात्मक अधिष्ठान -**

लोकनियुक्त प्रतिनिधींद्वारे विशिष्ट नागरी क्षेत्रातील शासन चालविले जाणे असा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आशय असतो. शासनाने दिलेल्या अधिकार क्षेत्राच्या मर्यादेत या संस्थांना कार्य पार पाडावे लागते. संविधानातील कलम ४० अन्वये स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्याची जबाबदारी राज्यावर सोपविण्यात आली होती. त्यानुसार ७४ वी घटनादुरुस्ती अधिनियम-१९९२ हा कायदा मंजूर करण्यात येऊन देशातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा बहाल करण्यात आला. या घटनादुरुस्तीने घटनेत भाग ९ (अ) ' नगरपालिका ' हे परिशिष्ट जोडण्यात आले. त्याअंतर्गत कलम २४३ ते ' ते ' २४३चछ' ही कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यात नगरपालिकेच्या कामकाजाबाबत तपशीलवार तरतूद करण्यात आली आहे. ७४ या घटनादुरुस्तीनंतर महाराष्ट्र शासनाने ' महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषद (सुधारणा) अधिनियम, १९९४ ' मंजूर केला आहे. सदर अधिनियम उपबंधाची (तरतूद) अंमलबजावणी करण्याची जबाबदारी त्यांच्या विविध प्राधिका-याकडे आणि घटकांवर सोपविण्यात आली आहे. ते प्राधिकारी पुढीलप्रमाणे -

१) नगरपालिका / महानगरपालिका

२) नगराध्यक्ष/महापौर

३) स्थायी समिती

४) विषय समित्या

५) प्रभाग समित्या

६) मुख्याधिकारी / आयुक्त

या अधिनियमानुसार नगरपालिकांना मालमत्ता संपादन करण्याचा आणि त्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा, करार करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. याव्यतिरिक्त पालिकांना कायदेशीर अडचणी उद्भवल्यास कायदेशीर न्यायालयीन कारवाई करण्याचाही अधिकार देण्यात आला आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजाबाबत ७४ व्या घटनादुरुस्तीला विशेष महत्व आहे. म्हणून सदर घटनादुरुस्तीचा तपशिल, वैशिष्ट्ये व महत्व जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

**७४ वी घटनादुरुस्ती**

केंद्र शासनाने जी ७४ वी घटनादुरस्ती केली आहे; ती नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित आहे. १९८६ मध्ये एल. एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. भारतातील पंचायत राज्य संस्थांना बळकटी देण्याच्या दष्टीने उपाययोजना सुचविण्या बाबत या समितीचे गठण करण्यात आले होते. या समितीने पंचायत राज्य संस्थांना घटनात्मक दर्जा देण्याची शिफारस केली

होती. त्यानुसार १९८९ मध्ये ग्रामीण व शहरी पंचायत राज्य व्यवस्थांसंदर्भात अनुक्रमे ६४ वी व ६५ वी घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर झाले. परंतु राज्यसभेच्या मंजूरी अभावी ते विधेयक मागे पडले. त्यानंतर पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या कारकिर्दीत सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत ७४ वी घटनादुरूस्ती विधेयक सादर करण्यात आले. ही घटनादुरूस्ती संविधान (चौऱ्याहत्तरावे विशोधन) अधिनियम - १९९२ या नावाने ओळखले जाते. कारण या विधेयकास १२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने आणि २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने मंजूरी दिली. या विधेयकाला निम्म्याहून अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळांनी मान्यता दिल्यानंतर २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले. १ जून १९९३ पासून ७४ व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी सुरु झाली. केंद्र शासनाने सर्व घटकराज्यांना व केंद्रशासित प्रदेशांना ३१ मे १९९४ पर्यंत ७४ व्या घटनादुरुस्तीसंदर्भात कायदे करून कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार महाराष्ट्र नगरपालिकांसंबंधीचा कायदा १९९४ मध्ये लागू करण्यात आला. संबंध देशभरातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात एकरुपता आणणारी ही घटनादुरुस्ती १९९३ चा ७४ वी घटनादुरुस्ती कायदा म्हणून ओळखला जातो.

**७४ घटनादुरुस्तीतील तरतूदी -**

७४ व्या घटनादुरूस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यात अमुलाग्र व क्रांतीकारक बदल आणले आहेत. या घटनादुस्तीनुसार भारतीय राज्यघटनेत ' नगरपालिका ' या शिर्षकाखाली 'भाग ९-अ' (Part IX-A) हा भाग नव्याने अंतर्भूत करण्यात आला आहे. त्यात कलम २४३ पी ते २४३ झेड जी अशा एकूण १८ कलमांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच घटनेमध्ये १२ वे परिशिष्ट जोडण्यात आले आहे. त्यात नगरपालिकांच्या अधिकारक्षेत्रात येणारे विषय नमूद करण्यात आले आहेत. या घटनादुस्तीमुळे भारतातील सर्व प्रकारच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना 'घटनात्मक दर्जा' मिळाला आहे. त्यामुळे स्वयंशासित प्रातिनिधिक लोकशाहीचे केंद्र म्हणून या संस्था कार्यान्वित झाल्या आहेत. या क्रांतीकारी कायदयातील प्रमुख वैशिष्टयपूर्ण तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.

१) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे ३ प्रकार पाडले - घटनेतील कलम २४३ (क्यू) नुसार महाराष्ट्र राज्यविधिमंडळाने कायद्याव्दारे नागरी क्षेत्रात खालील ३ संवर्ग निश्चित केले.

अ) ग्रामीण क्षेत्रातून शहरी क्षेत्रात संक्रमण होत असलेली संक्रमणावस्थेतील नागरी क्षेत्रात नगरपंचायत

ब) लहान नागरी क्षेत्रासाठी नगर परिषदा

क) मोठया नागरी क्षेत्रासाठी महानगरपालिका

**२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना -**

कलम २४३ (आर) नुसार या संस्थांच्या रचनेसंदर्भात तरतूद केली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने नागरी स्थानिक संस्थांमध्ये खालील प्रकारच्या सदस्यांना प्रतिनिधीत्व देण्याची तरतूद केली आहे.

अ ) नागरी प्रशासनाचे विशेष ज्ञान व अनुभव असणा-या नागरीकांना या संस्थेत सहयोगी सदस्य किंवा नामनिर्देशित सदस्य (co-opt) म्हणून नियुक्ती करता येईल.

ब)नागरी क्षेत्रातून प्रतिनिधित्व करणारे लोकसभा, राज्यसभा व राज्यविधिमंडळाचे सदस्यांना या संस्थांमध्ये सदस्य म्हणून घेता येईल.

क) नगरपालिकेच्या विविध समित्यांचे अध्यक्ष वा सभापती यांना नगरपालिका सदस्य म्हणनू घेता येईल.

ड) नगरपालिकेचे अध्यक्ष/महापौर शासनाने ठरविलेल्या कायदयानुसार निवडले जातील.

**वॉर्ड किंवा प्रभाग समित्यांची निर्मिती -**

कलम २४३ (एस) वॉर्ड किंवा विभागीय समित्या स्थापना करण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार ३ लाख किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणा-या नागरी क्षेत्रामध्ये एक किंवा अधिक वॉर्डचा समावेश

असलेल्या विभागीय समित्या स्थापन करता येतात. त्यांची रचना, क्षेत्र, सदस्यांची निवड यासंबंधी राज्यशासनाच्या कायदयामार्फत स्पष्ट करण्यात येते. तसेच प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवकांनाच प्रभाग समितीवर सदस्य म्हणून घेण्यात येईल अशीही तरतूद त्यात आहे. प्रभागातील अडचणी विचारात घेउन त्यांची सोडवणुक होण्याच्यादृष्टीने या समित्यांचे गठन मोठया शहरांमध्ये विशेषत: महापालिकामध्ये केले जाते. तथापि या प्रभाग समित्यांच्या कार्याचे मूल्यमापन होण्याची गरज आहे.

**आरक्षणाची तरतूद** -

कलम २४३ (टी) नुसार नगरपालिका व महानगरपलिकांमध्ये अनुसूचित जाती, जमाती व इत्तर मागास प्रवर्ग तसेच महिलांनाही आरक्षण देण्यासंबंधी तरतूद आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आळीपाळीने हे आरक्षण निश्चित करण्याचा अधिकार राज्यशासनाला दिला आहे. अलिकडेच सर्व प्रवर्गातील महिलांना ५०% आरक्षण देण्याची महत्वाची तरतूद करण्यात आली आहे. ७४ व्या घटनादुरूस्ती पूर्वी मागासवर्गीयांना व महिलांना आरक्षण नव्हते. १९९४ नंतर महिलांना १/३ (३३%) आरक्षण देण्यात आले होते. सध्या त्यात वाढ केली आहे.

**नियमित निवडणूका व निश्चित कार्यकाळ -**

७४ व्या घटनादुरूस्तीच्या आधी राज्यातील नगरपालिकांच्या निवडणूकांचा कार्यकाल या बाबत निश्चितता नव्हती. राजकीय हस्तक्षेपामुळे नगरपालिका मुदतपूर्व बरखास्त करणे, मुदतवाढ देणे या सारखे प्रकार होत होते. मात्र या घटनादुरूस्तीतील कलम २४३ (यु) नुसार नागरी संस्थांचा कार्यकाल ५ वर्षे इतका निश्चित केला असून हा कार्यकाल संपण्यापूर्वी आगामी निवडणूकीचे नियोजन करण्याचे बंधन राज्यशासनावर घालण्यात आले आहे. मात्र विशिष्ट परिस्थितीत या संस्था मुदतपूर्व बरखास्त करण्याचा अधिकार शासनाला देण्यात आला आहे. मात्र त्यानंतर ६ महिन्यांच्या आत पुन्हा निवडणुका घेण्याचे बंधन घालण्यात आले आहे. या तरतूदीमुळे नागरी स्थानिक शासनामधील राज्यशासनाच्या आणि पुढा-यांच्या अतिरेकी हस्तक्षेपाला आळा बसला असून या संस्थांना स्थैर्य लाभले आहे. या घटनादुरूस्तीचे हे एक महत्वाचे वैशिष्टये मानले जाते. आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर निवडणुकीस उमेदवाराच्या वयाची अट २५ वर्षाऐवजी २१ वर्ष करण्यात आली आहे. घटनादुरूस्तीने नगरपालिकांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी राज्यनिर्वाचन आयोगाकडे सोपविण्यात आली आहे.

**नागरी शासनसंस्थांचे अधिकार व कार्ये -**

७४ व्या घटनादुरुस्तीपूर्वी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मर्यादित स्वरुपाचे अधिकार देण्यात आले होते. या संस्थांना अधिक जबाबदार व अधिकारक्षम बनविण्याच्या उद्देशाने या घटना दुरूस्तीने नागरी शासनाच्या अधिकार, कर्तव्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यासंदर्भात कलम २३४ (व्ही) हे कलम महत्वाचे आहे. सदर कलमानुसार आपापल्या नागरी क्षेत्रात सामाजिक व आर्थिक न्यायासाठी योजना तयार करण्याचा अधिकार नागरी संस्थांना प्राप्त झाला आहे. याशिवाय घटनेत नव्याने १२ वे परिशिष्ट जोडण्यात आले असून त्यात नगरपालिका व महानगरपालिकांकडे १८ अनिवार्य (आवश्यक) कार्ये सोपविण्यात आली आहेत.

१) नगर नियोजन
२) जमिन वापर व बांधकाम नियोजन/नियंत्रण.
३) सामाजिक व आर्थिक नियोजन
४) रस्ते व पुल
५) घरगुती, व्यापारी व औद्योगिक प्रयोजनार्थ पाणीपुरवठा
६) सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि मलनिस्सारण व्यवस्थापन.

७) अग्निशमन यंत्रणा

८) नागरी वनीकरण, पर्यावरण रक्षण.

९) अपंग, मतिमंद आणि दुर्बल घटकांच्या हितसंबंधाचे संरक्षण.

१०) गलिच्छ वस्ती सुधारणा.

११) नागरी क्षेत्रातील दारिद्रय निर्मूलन.

१२) वने, उपवने, खेळाची मैदाने यासह अन्य नागरी सोयी-सुविधा.

१३) सांस्कुतिक व शैक्षणिक विकास आणि शहराचे सौंदर्य वाढविणे.

१४) स्मशानभूमी व विद्युतदाहिनी.

१५) जनावरांसाठी कोंडवाडा, त्यांच्यावरील अत्याचारास प्रतिबंध.

१६) जन्म-मृत्यू नोंद.

१७) दिवाबत्ती, वाहनतळ, बसथांबे इ. सार्वजनिक सुविधा.

१८) कत्तलखाने व चर्मप्रक्रिया कारखान्यांचे नियोजन व नियंत्रण.वरील

१८ विषयांच्या अनुषंगाने येणारी अन्य कामेही नगरपालिका व महानगरपालिकांना करावी लागतात.

**जिल्हा नियोजन समिती -** या समितीला जिल्हा नियोजन व विकास समिती या नावानेही ओळखतात. सर्व जिल्हयामधील ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हयाचा एकत्रित विकास व्हावा, त्याबाबत नियोजन जिल्हास्तरावर व्हावे या उद्देशाने ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार घटनेत २४३ (झेड डी) हे कलम अंतर्भूत करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी एक जिल्हा नियोजन व विकास समिती स्थापन केली जाते. ' महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम - १९९८' या कायद्याने महाराष्ट्रातील जिल्हा नियोजन समितीस कायदेशिर मान्यता प्राप्त झाली. दिनांक ९ आक्टोबर १९९८ पासून या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. त्यानुसार महाराष्ट्रात जिल्हा नियोजन समितीची रचना, अधिकार व कामे इ. बाबीची कार्यवाही केली जाते.

अ) **समितीची रचना**

प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हयाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात 30 ते ५० सदस्यांचा समावेश या समितीत असेल त्यापैकी ४/५ सदस्यांची निवड स्थानिक स्व-शासन संस्थांनी करणे बंधनकारक आहे. (२० लाख पर्यंत लोकसंख्या = ३० सदस्य, ३० लाख पर्यंत लोकसंख्या = ४० सदस्य, ३० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या = ५० सदस्य याप्रमाणे )

जिल्हा नियोजन समितीत पुढील सदस्यांचा समावेश होतो. -

१) जिल्हयाचा पालकमंत्री - समितीचा पदसिध्द अध्यक्ष.

२) जिल्हा परिषद अध्यक्ष.

३) जिल्हयाशी संबंधित संवैधानिक विकास मंडळाचा एक प्रतिनिधी.

४) महसुल आयुक्त ( विभागीय).

५) जिल्हाधिकारी - समितीचा सचिव म्हणून कार्य.

६) जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी.

७) नामनिर्देशित सदस्य - संबंधित अनुभव व ज्ञान असलेले २ ते ४ सदस्य.

८) निवडून आलेले सदस्य - समितीच्या एकूण सदस्य संख्येच्या १/५ सदस्य लोकसंख्येच्या प्रमाणात ग्रामीण व नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेले सदस्य या समितीवर निवडले जातात. (त्यांची निवड एकल संक्रमणिय मताव्दारे केली जाते.)

९) विशेष निमंत्रित सदस्य - जिल्हा क्षेत्रातून निवडून आलेले संसद सदस्य, राज्य विधिमंडळ सदस्य, विशेष निमंत्रित सदस्य हे समितीच्या बैठकीत प्रत्यक्ष कामकाजात भाग घेऊ शकतात. या समितीत मागासवर्गीय व महिलांना आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**ब) अधिकार व कार्य -**

१) जिल्हयातील ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलल्या योजनांवर विचारविनिमय करून जिल्हयाचा विकास आराखडा (योजना) तयार करणे. त्यास मान्यता देणे.

2) वार्षिक प्रगतीचा आढावा घेणे.

3) जिल्हयातील साधन संपत्तीचे एकत्रित नियोजन करणे.

४) जिल्हा नियोजन व विकास समितीने मंजूर केलेला आराखडा (प्रारूप) जिल्हयाचे पालकमंत्री तथा या समितीचे अध्यक्ष राज्य शासनाच्या अंतिम मंजूरीसाठी पाठवितात.

**क) आर्थिक तरतूद -**

केंद्र आणि राज्य शासनाने तयार केलेल्या विविध योजनांसाठी मंजूर केलेल्या निधीप्रमाणे जिल्हयाच्या विकास आराखडयाच्या अंमलबजावणीस आर्थिक तरतूदी केल्या जातात. संबंधीत क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती व संस्थांशी विचारविनिमय करून राज्यपाल सदर निधी कसा खर्च करावा यासंबंधी निर्देश देत असतात.

**महानगर प्रादेशिक क्षेत्र नियोजन समिती** -

भारतात मुंबई, कलकत्ता, दिल्ली व चेन्नई आदि महानगरांचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढत्या क्षेत्राचा (Metro Politan Area) समावेश महानगर प्रादेशिक क्षेत्रात करण्यात येतो. त्यानुसार कलम २४३ (२ ई) महानगर प्रादेशिक क्षेत्र नियोजन समिती गठीत करण्यात येते. महाराष्ट्रात मुंबईत ' मुंबई मेट्रोपोलिटन रिजन डेव्हलपमेंट अथॉरिटी ' ची स्थापन करण्यात आली असून ही समिती MMRDA या नावाने ओळखली जाते. मुंबई क्षेत्रातील विकास आराखडा व नियोजन याबाबतची जबाबदारी MMRDA कडे असते. साधारणत: मुख्यमंत्री MMRDA चे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. यामध्ये नगरविकास मंत्रालय, वन आणि पर्यावरण मंत्रालय, संरक्षण मंत्रालय यांची भूमिका महत्त्वाची असते.

या समितीची रचना राज्य शासनाच्या कायदयानुसार करण्यात येते. या क्षेत्रातील नियोजन व विकास कार्यासाठी केंद्र शासनामार्फत स्वतंत्र निधी उपलब्ध करुन दिला जातो. याव्यतिरिक जागतिक बँक, एशियन डेव्हलपमेंट बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या जागतिक संस्थांकडूनही अर्थसहाय्य दिले जाते. त्यामुळे पाणीपुरवठा, जलनिस्सारण, दारिद्रय निर्मुलन, झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम या सारखे उपक्रम राबविण्यासाठी आर्थिक निधी उपलब्ध होतो. जिल्हयाच्या विकासात ज्याप्रमाणे जिल्हा नियोजन समितीची भूमिका महत्वाची आहे, त्याप्रमाणे महानगरांच्या विकासात महानगर प्रादेशिक क्षेत्र नियोजन समितीची भूमिका अतिशय महत्वाची असते.

**७४ व्या घटनादुरूस्तीची अन्य वैशिष्टये -**

१) नगरपालिकांनी आपले हिशेब ठेऊन त्यांचे परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

२) केंद्रशासित प्रदेशांनाही ही घटनादुरुस्ती लागू करण्यात आली आहे. मात्र कलम २२४ (१) व (२) मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रांना ही घटनादुरूस्ती लागू करण्यात आली नाही.

**७४ व्या घटनादुरुस्तीचे महत्व -**

७४ व्या घटनादुरूस्तीमुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये मूलभूत व क्रांतिकारक बदल घडून आला आहे. या घटनादुरुस्तीमुळे नागरी संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे राज्यशासनाला नगरपालिकांच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास अटकाव करण्यात आला आहे. या कायदयातील तरतूदीमुळे

पालिकांच्या निवडणूका नियमित घेणे, हिशेब ठेवणे व लेखापरीक्षण करणे बंधनकारक झाले आहे. त्यामुळे नगरपालिकांच्या/ महानगरपालिकांच्या कार्यात स्थैर्य व शिस्त निर्माण झाली आहे.

**संदर्भ -**

१) प्रा.बी.बी. पाटील : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था. फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२) चौधरी द.ह. : महाराष्ट्र नगरपरिषदा निवडणूक अधिनियम.
३) र.घ. वराडकर, सौ. नंदा अ. राशिनकर : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था. निराली प्रकाशन, पुणे.
४) डॉ. नितीन बिरमल, डॉ. वैशाली पवार : महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, डायमंड पब्लिकेशन्स.
५) प्रा.व्ही.बी. पाटील : महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, के ' सागर.